आरोपीची संक्षिप्त संपरिक्षा भारतीय नागरीक सुरक्षा संहितेप्रमाणे
**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २६/२०२५** चा अभिलेख
सी.एन.आर.क्र. एम.एच.एस.आय ०९-०००८३-२०२५

**<u>श्रीकांत एस. पचंडी, न्यायदंडाधिकारी वर्ग १, देवगड</u>**

**निशाणी**

| | | |
|---|---|---|
| १) अपराध घडल्याचा दिनांक | : | ३१/०१/२०२५ |
| २) अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | २५/०२/२०२५ |
| ३) फिर्यादीचे नाव, वय व पत्ता | : | देवगड अर्बन को ऑप बँक लिमिटेड, देवगड<br>ता.देवगड जि.सिंधुदुर्ग करिता<br>कनिष्ठ अधिकारी<br>संतोष रामचंद्र कणेरकर<br>वय- ५२ वर्षे, धंदा- सेवानिवृत्त<br>रा. मु.पो. देवगड,<br>ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग |
| ४) आरोपीचे नाव, वय व पत्ता | : | योगेश सुमन आंगणे<br>वय - ३८ वर्षे, धंदा- शेती<br>रा. बांबुळी तर्फ हवेली,<br>ता.कुडाळ, जि. सिंधुदुर्ग |

५) ज्या बद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील :

तुम्ही फिर्यादी यांचेकडून घेतलेल्या कर्ज रक्कमेच्या परत फेडीसाठी तुम्ही फिर्यादीला दिलेला युको बँक, शाखा कुडाळ यांचेकडील दि.२७/१२/२०२४ रोजीचा धनादेश क्र.८६४५०९ रक्कम रुपये ५३,०००/- चा धनादेश दिला. सदरचा धनादेश फिर्यादीने त्यांचे खाते असलेल्या सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमी., शाखा देवगड येथे जमा केले असता संबंधित बँकेने वरील नमुद धनादेश तुमच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे Fund Insufficient न वटविता दिनांक ३१/१२/२०२४ रोजी परत केला आणि फिर्यादीने दि.१४/०१/२०२५ रोजी धनादेशाची रक्कम मागणीसाठी तुम्हाला पाठविलेली कायदेशिर नोटीस तुम्हाला दिनांक १५/०१/२०२५

रोजी मिळून देखील तुम्ही १५ दिवसात धनादेशाची रक्कम दिली नाही आणि म्हणून तुम्ही चलनक्षम दस्तऐवज कायद्याचे कलम १३८ अन्वये शिक्षापात्र अपराध केला.

६) आरोपीचे प्रतिकथन :

प्रश्न क्र. १ : तुम्हाला फिर्यादी पक्षाच्या कागदपत्रांच्या नकला मिळाल्यात काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.२ : तुमच्यावर असलेला दोषारोप आता वाचून दाखविला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर : नाही, मला गुन्हा कबूल नाही.

दिनांक :०९/०७/२०२६

------------------

(आरोपीची सही )

समक्ष

(श्रीकांत एस. पचंडी)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, देवगड

दिनांक : ०९/०७/२०२६